असा. क्र. ६५ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०

८०५

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, डिसेंबर ८, १९९७/अग्रहायण १७, शके १९१९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४.**—सफाई कर्मचाऱ्यांकरिता राज्यस्तरीय आयोगाची रचना करणे व त्याच्याशी संबंधित किंवा अनुषंगिक बाबींची तरतूद करणे यांकरिता अधिनियम .. .. .. | ६७६-६८१ |

दिनांक ३० नोव्हेंबर १९९७ रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४.

[राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ८ डिसेंबर १९९७ रोजी प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**सफाई कर्मचाऱ्यांकरिता राज्यस्तरीय आयोगाची रचना करणे व त्याच्याशी संबंधित किंवा अनुषंगिक बाबींची तरतूद करणे यांकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** सफाई कर्मचाऱ्यांच्या उन्नतीसाठी, त्यांची मुक्तता व पुनर्वसन यांसाठी महाराष्ट्र राज्यात असलेल्या विविध कल्याण योजनांच्या संनियंत्रणाकरिता राज्यस्तरीय आयोगाची स्थापना करून विशेष कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व कालावधी.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग अधिनियम, १९९७ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास तो अंमलात येईल.

(४) आयोगाचा अवधी पाच वर्षांकरिता असेल :

परंतु असे की, राज्य शासनाला, योग्य वाटेल त्याप्रमाणे आयोगाची मुदत कमी करता येईल किंवा वाढवता येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "अध्यक्ष" याचा अर्थ, आयोगाचा अध्यक्ष;

(ब) "आयोग" याचा अर्थ, कलम ३ अन्वये रचना करण्यात आलेला महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग;

(क) "सदस्य" याचा अर्थ, आयोगाचा सदस्य;

(ड) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांन्वये विहित;

(ई) "सफाई कर्मचारी" याचा अर्थ, हाताने मानवी विष्ठा वाहून नेणारी किंवा कोणतेही स्वच्छतेचे काम करणारी किंवा त्यासाठी कामावर ठेवलेली व्यक्ती;

(फ) "उपाध्यक्ष" याचा अर्थ, आयोगाचा उपाध्यक्ष.

## प्रकरण दोन

## सफाई कर्मचारी आयोग

आयोगाची रचना व आयोग त्याचे मुख्यालय.

३. (१) राज्य शासनाला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मंडळाची, या अधिनियमान्वये त्याच्याकडे सोपवलेल्या अधिकारांचा वापर करण्याकरिता आणि नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडण्याकरिता, रचना करता येईल.

(२) आयोग सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासाचे आणि कल्याणाचे काम करणाऱ्या व्यक्तींमधून राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे पुढील व्यक्ती मिळून बनलेला असेल :—

(अ) अध्यक्ष,

(ब) उपाध्यक्ष; आणि

(क) पाच सदस्य : परंतु असे की, त्यांपैकी किमान एक महिला सदस्य असेल.

(३) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे घोषित करील त्या ठिकाणी आयोगाचे मुख्यालय असेल.

अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांचा पदावधी आणि सेवेच्या शर्ती.

४. (१) अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि प्रत्येक सदस्य राज्य शासन या बाबतीत विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे तीन वर्षांपेक्षा अधिक नाही इतक्या कालावधीपर्यंत पद धारण करतील.

(२) अध्यक्षाला, उपाध्यक्षाला किंवा सदस्याला राज्य शासनाला उद्देशून लिहिलेल्या नोटिशीद्वारे अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा यथास्थिति, सदस्य या पदाचा कोणत्याही वेळी राजीनामा देता येईल.

(३) राज्य शासन, अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सदस्य या पदावरील व्यक्तीला पुढील बाबतीत पदावरून दूर करील :—

(अ) ती व्यक्ती अमुक्त नादार होईल तर;

(ब) राज्य शासनाच्या मते नैतिक अध:पात अंतर्भूत असलेल्या अपराधाबद्दल तिला दोषी ठरवून कारावासाची शिक्षा झालेली असेल तर;

(क) ती विकल मनाची व्यक्ती होईल आणि सक्षम न्यायालय ती तशी व्यक्ती असल्याचे घोषित करील तर;

(ड) ती आपले काम करण्यास नकार देईल किंवा आपले काम करण्यास किंवा कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ होईल तर;

(ई) आयोगाकडून अनुपस्थित राहण्याची परवानगी न घेता आयोगाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना ती अनुपस्थित राहील तर; किंवा

(फ) राज्य शासनाच्या मते त्या व्यक्तीने अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सदस्य या पदाचा इतका दुरुपयोग केला असेल की, तिने अशा पदावर राहाणे लोकहितास मारक ठरत असेल तर :

परंतु असे की, कोणत्याही व्यक्तीला याबाबतीत स्वत:चे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज तिला या खंडान्वये पदावरून दूर करण्यात येणार नाही.

(४) पोट-कलमे (१) व (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयोगाचे सर्व पदधारक राज्य शासनाची मर्जी असेल तोवर पद धारण करतील आणि त्यांना त्यांचा पदावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी काढून टाकता येईल.

(५) पोट-कलम (२), (३) किंवा (४) अन्वये किंवा अन्यथा रिक्त झालेले पद नव्याने नामनिर्देशन करून भरण्यात येईल आणि अशा रीतीने नामनिर्देशित केलेली व्यक्ती, जर असे पद रिक्त झाले नसते तर आधीच्या व्यक्तीने तिच्या पदावधीपैकी ज्या उरलेल्या मुदतीसाठी ते पद धारण केले असते ती मुदत समाप्त होईपर्यंत पद धारण करील.

१९५६ (६) आयोगाच्या अध्यक्षाला महाराष्ट्र शासनाच्या राज्य मंत्र्याचा दर्जा असेल आणि महाराष्ट्र
चा मुंबई मंत्र्यांची वेतने व भत्ते यांबाबत अधिनियमान्वये राज्य मंत्र्याला देय असलेले वेतन व भत्ते आणि
४८. त्याला उपलब्ध होणारे इतर सर्व भत्ते मिळण्यास तो हक्कदार असेल.

(७) उपाध्यक्ष आणि सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या विहित करण्यात येतील त्या प्रमाणे असतील.

**आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी.**

५. (१) राज्य शासन, आयोगासाठी, या अधिनियमाखालील कामे कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी आवश्यक एवढ्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची तरतूद करील.

(२) आयोगाच्या प्रयोजनार्थ नेमण्यात आलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि इतर सेवेच्या अटी व शर्ती विहित केल्याप्रमाणे असतील.

**रिक्त पद इत्यादींमुळे आयोगाची कार्यवाही विधीअग्राह्य न ठरवणे.**

६. आयोगाचे कोणतेही कृत्य किंवा कार्यवाही केवळ आयोगातील कोणतेही पद रिक्त असल्याच्या किंवा त्याच्या रचनेत दोष असल्याच्या कारणावरून प्रश्नास्पद किंवा विधिअग्राह्य ठरणार नाही.

**आयोगाने कार्यपद्धती विनियमित करणे.**

७. (१) आयोग, आवश्यक असेल तेव्हा बैठक घेईल व अध्यक्षास योग्य वाटेल अशा वेळी व ठिकाणी अशी बैठक घेतली जाईल.

(२) आयोग स्वत: आपली कार्यपद्धती विनियमित करील.

(३) अध्यक्ष किंवा या संबंधात अध्यक्षाच्या वतीने प्राधिकृत केलेल्या आयोगाच्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याद्वारे आयोगाचे सर्व आदेश आणि निर्णय अधिप्रमाणित करण्यात येतील.

## प्रकरण तीन

### आयोगाची कार्ये आणि अधिकार

आयोगाची कार्ये आणि अधिकार. ८. (१) आयोग, पुढील सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडील :—

(अ) सफाई कर्मचाऱ्यांचा दर्जा, त्यांना मिळणाऱ्या सुविधा आणि संधी यासंबंधीच्या विषमता दूर करण्याकरिता कालबद्ध कृती करण्यासाठी राज्य शासनास विशिष्ट कार्यक्रमांची शिफारस करणे;

(ब) सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक पुनर्वसनाशी संबंधित कार्यक्रमांच्या व योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास आणि मूल्यमापन आणि अशा कार्यक्रमांचे आणि योजनांचे अधिक चांगले सुसूत्रीकरण व अंमलबजावणी करण्याकरिता राज्य शासनाला सूचना करणे ;

(क) राज्य शासन आणि निमशासकीय संस्था, तसेच प्राप्तानुदान संस्था यांच्या विविध आस्थापनांना भेट देणे व उक्त संस्थांची माहिती मिळवणे किंवा त्यांना सल्ला किंवा सूचना देणे ;

(ड) विशिष्ट गाऱ्हाण्यांबाबत तपास करणे आणि पुढील कामांची अंमलबजावणी राहिली आहे अशा प्रकरणांची स्वतः होऊन दखल घेणे :—

(एक) सफाई कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही गटाशी संबंधित कार्यक्रम किंवा योजना ;

(दोन) सफाई कर्मचाऱ्यांच्या हालअपेष्टा दूर करण्याच्या उद्देशाने घेतलेले निर्णय, घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा दिलेल्या सूचना;

(तीन) सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीकरिता उपाययोजना ;

(चार) सफाई कर्मचाऱ्यांना लागू होणाऱ्या कोणत्याही कायद्यातील तरतुदी;

व संबंधित प्राधिकरणाकडे किंवा राज्य शासनाकडे या बाबी नेणे;

(ई) सफाई कर्मचाऱ्यांना येणाऱ्या कोणत्याही अडचणी किंवा त्यांच्या निःसमर्थता विचारात घेऊन सफाई कर्मचाऱ्यांशी संबंधित कोणत्याही विषयावर राज्य शासनास नियतकालिक अहवाल पाठवणे;

(फ) राज्य शासन त्याच्याकडे निर्देशित करील अशा कोणत्याही इतर बाबतीत कार्यवाही करणे.

(२) पोट-कलम (१) अन्वयेची आपली कामे पार पाडताना, आयोगाला, राज्य शासन किंवा स्थानिक किंवा इतर निम-शासकीय प्राधिकरण यांच्याकडून त्या पोट-कलमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही बाबीशी संबंधित असलेली माहिती मागवण्याचा अधिकार असेल.

## प्रकरण चार

### वित्त, लेखे आणि लेखापरीक्षा अहवाल

राज्य शासनाकडून अनुदाने. ९. (१) राज्य शासन, राज्य विधानमंडळाने या संबंधात कायद्याद्वारे योग्य ते विनियोजन केल्यानंतर या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ वापरण्याकरिता राज्य शासनाला योग्य वाटतील अशा रकमा मंडळाला राज्याच्या एकत्रित निधीतून अनुदाने म्हणून देईल.

(२) या अधिनियमाखालील कामे पार पाडण्याकरिता आयोग, त्याला योग्य वाटतील अशा रकमा खर्च करील आणि अशा रकमा पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या अनुदानांतून देय असा खर्च असल्याचे समजण्यात येईल.

लेखे आणि लेखापरीक्षा. १०. (१) महाराष्ट्र राज्याच्या महालेखाकाराशी विचारविनिमय करून राज्य शासन विहित करील अशा नमुन्यात आयोग योग्य लेखे आणि इतर संबद्ध अभिलेख ठेवील आणि लेख्यांचा वार्षिक अहवाल तयार करील.

(२) राज्याचा महालेखाकार, तो विनिर्दिष्ट करील अशा कालांतराने आयोगाच्या वार्षिक लेख्यांची लेखापरीक्षा करील आणि अशा लेखापरीक्षेच्या संबंधात करण्यात आलेला कोणताही खर्च आयोगाकडून महालेखाकारास देय असेल.

(३) शासनाच्या लेख्यांच्या परीक्षेसंबंधात महालेखाकाराला सर्वसाधारणपणे जे हक्क, विशेषाधिकार आणि प्राधिकार असतात तेच हक्क, विशेषाधिकार आणि प्राधिकार या अधिनियमान्वये आयोगाच्या लेख्यांच्या परीक्षेसंबंधात महा लेखाकाराला आणि त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीला असतील, आणि, विशेषतः त्याला पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके आणि इतर दस्तऐवज व कागदपत्रे प्रस्तुत करण्यास सांगण्याचा आणि आयोगाची कोणतीही कार्यालये तपासण्याचा हक्क असेल.

(४) महालेखाकाराने किंवा या बाबतीत त्याने यथोचित रीत्या नियुक्त किंवा प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर व्यक्तीने प्रमाणित केल्याप्रमाणे आयोगाचे लेखे त्यासंबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासह आयोग दर वर्षी राज्य शासनाला पाठवील.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

आयोगाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य आणि कर्मचारी लोकसेवक असणे.

१८६० चा ४५. ११. भारतीय दंड संहितेच्या कलम २१ अनुसार आयोगाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, अधिकारी आणि इतर कर्मचारी हे लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

राज्य शासनाने आयोगाशी विचार-विनिमय करणे.

१२. सफाई कर्मचाऱ्यांवर परिणाम करणाऱ्या सर्व महत्त्वाच्या धोरणविषयक बाबींवर राज्य शासन आयोगाशी विचारविनिमय करील.

वार्षिक अहवाल.

१३. आयोग प्रत्येक वर्षी, मागील वित्तीय वर्षी करण्यात आलेल्या कामासंबंधीचा संपूर्ण वार्षिक अहवाल विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा वेळी, तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे सादर करील.

वार्षिक अहवाल विधानसभेपुढे ठेवणे.

१४. (१) राज्य शासन, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे, आयोगाचा वार्षिक अहवाल ठेवण्याची व्यवस्था करील आणि राज्य शासनाशी संबंधित असणाऱ्या त्यातील शिफारशींवर आतापर्यंत करण्यात आलेली किंवा करण्याचे प्रस्तावित केलेली कार्यवाही आणि अशा शिफारशींपैकी काही स्वीकारण्यात आल्या नाहीत तर त्याची कारणे स्पष्ट करील.

(२) जेव्हा उक्त अहवाल किंवा त्याचा कोणताही भाग केंद्र शासनाच्या कोणत्याही बाबींशी संबंधित असेल तेव्हा अशा अहवालाची एक प्रत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी भारत सरकारला पाठवण्यात येईल.

अधिकार सोपवणे.

१५. आयोग अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा आयोगाचा कोणताही सदस्य किंवा आयोगाचा कोणताही अधिकारी याला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही शर्ती आणि मर्यादा असल्यास त्यांच्या अधीन राहून, त्याला योग्य वाटतील असे या अधिनियमाखालील त्याचे अधिकार आणि कर्तव्ये सोपवू शकेल.

सद्भावपूर्वक केलेल्या कृत्याबद्दल कार्यवाहीचे आणि संरक्षण. १६. या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या अथवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल आयोगाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य किंवा कोणताही अधिकारी किंवा इतर कर्मचारी आणि राज्य शासन यांच्याविरुद्ध दावा, अभियोग अथवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार. १७. (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी राज्य शासनाला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या सार्वत्रिकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :—

(अ) कलम ४, पोट-कलम (७) अन्वये उपाध्यक्ष व सदस्य आणि कलम ५, पोट-कलम (२) अन्वये अधिकारी आणि इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती ;

(ब) कलम १० अन्वये महाराष्ट्र राज्याच्या महालेखाकाराशी विचारविनिमय करून ज्या नमुन्यात वार्षिक लेखा विवरणपत्र तयार करण्यात येईल तो नमुना ;

(क) कलम १३ अन्वये वार्षिक अहवाल ज्या नमुन्यात व ज्या वेळी तयार करण्यात येईल व सादर करण्यात येईल तो नमुना व ती वेळ ;

(ड) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येतील अशा इतर कोणत्याही बाबी.

(३) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील आणि असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर तो नियम अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून, केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति तो अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई